कमी खर्चीक वैद्यकीय साधनांना प्राधान्य

तळागाळात वैद्यकीय साधने पोहोचविण्यासाठी केंद्र प्रयत्नशील

आरोग्य वार्ता

पीटीआय, नवी दिल्ली

सर्वसामान्यांना परवडतील अशा वैद्यकीय साधनांचे प्रदर्शन शुक्रवारी नवी दिल्लीत भरले होते. केंद्र सरकारच्या माध्यमातून हे प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्यात रक्तातील ग्लुकोजची मात्रा मोजण्यासाठीचे यंत्र, हिमोग्लोबीनची पातळी माफक यंत्र, मलेरिया, डेंग्यू या आजारांचे निदान करणारी साधने यांचा समावेश होता. कमी खर्चीक वैद्यकीय साधनांना प्राधान्य देणार असल्याचा निर्धार केंद्र सरकारने यावेळी व्यक्त केला.

या साधनाची निर्मिती केंद्राच्या जैवतंत्रज्ञान विभागाने (डीबीटी) केली आहे. केंद्रीय विज्ञान-तंत्रज्ञान मंत्री हर्षवर्धन यावेळी उपस्थित होते.

300% MORE OXYGEN
Manikchand
Oxyrich

सद्यस्थितीत भारतीय आरोग्य तंत्रज्ञानाने आशिया खंडात चौथ्या स्थानावर झेप घेतली असून या माध्यमातून २०२५ पर्यंत २० अब्ज अमेरिकन डॉलरची उलाढाल होण्याचे भाकीतही त्यांनी वर्तविले.

आरोग्य सेवा आणि तंत्रज्ञान या क्षेत्रातील नवनवीन संकल्पना व संशोधनाला अनन्यसाधारण असे महत्त्व असून देशाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीलाही त्यामुळे वेग मिळतो. या नवकल्पनांचे फायदे हे तळागाळातील लोकांपर्यंत पोहचणे गरजेचे असल्याचे मत हर्षवर्धन यांनी यावेळी व्यक्त केले.

या वेळी प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या 'एआयएनए' उपकरणांचे प्रात्यक्षिक डीबीटीचे सचिव विजय राघवन यांनी सादर केले. हे उपकरण मोबाइलमध्ये बसविल्याने रक्तातील ग्लुकोज, स्निग्ध पदार्थ, क्रियेटिन आणि हिमोग्लोबिनची मात्राचे मोजमाप करणे सहजशक्य होते. यासाठी उपकरणात केवळ दहा रुपयांची एक स्ट्रिप टाकावी लागते. कंपनीकडे आतापर्यंत अशा २५ हजार स्ट्रिपची मागणी झाल्याची माहिती डीबीटीच्या वरिष्ठ सल्लागार आणि बायोटेक्नालॉजी इंडस्ट्री रिसर्च असिस्टन्ट कौन्सिल (बीआयआरएसी)च्या व्यवस्थापकीय संचालक रेणू स्वरूप यांनी दिली. अशाच स्वरूपाचे आणखीन एक उपकरण या प्रदर्शनात मांडण्यात आले आहे. ज्यामुळे प्राथमिक स्वरूपातील मलेरिया, डेंग्यू आणि विषमज्वरसारख्या आजारांचे निदान होणे शक्य आहे.

अपघातानंतर झालेल्या दुखापतीचे निदान करून रुग्णाला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, असे तंत्रज्ञानही विकसित केले गेले आहे. सध्या भारतात जवळपास १३ दक्षलक्ष अपघात घडतात, त्यापैकी ५ दक्षलक्ष अपघातांमध्ये पायाची दुखापत झाली आहे. या तंत्रज्ञानाकडून याबाबतची शाश्वती व्यक्त करताना रुग्ण दाखल झाल्यावर केलेल्या पहिल्या एक्स-रे आणि एमआरआयनंतर लगेच दुखापत झालेल्या पायावर उपचार केले जातात. हे जगातील एकमेव असे तंत्रज्ञान असून त्यांची किंमत केवळ २४९ रुपये असल्याचे हृदयरोगतज्ज्ञ प्रा. बलराम भार्गव यांनी सांगितले.

(टीप : 'आरोग्यवार्ता'मधील बातम्या या जगभरातील संशोधकांनी केलेल्या वैद्यकीय संशोधनावर आधारित असतात. त्यामुळे त्यातील मतांशी 'लोकसत्ता'चा संबंध नाही. कोणताही वैद्यकीय उपचार करण्यापूर्वी आरोग्यतज्ज्ञांशी व डॉक्टरांशी सल्लामसलत करणे आवश्यक आहे.)

काविळ, पित्ताशयातील खडे, लिव्हर सिरोसिस,
लिव्हरचे विकार, Hepatitis B

शारंगधर

तज्ज्ञ आयुर्वेदिक डॉक्टरांकडून मोफत तपासणी व सल्ला

इत्यादी गंभीर तक्रारींवर
'शारंगधर संपूर्ण आयुर्वेदिक उपचार पद्धतीने' हमखास रिझल्ट मिळवा.

- हर्षवर्धन अपार्टमेंट, तळ मजला, सहकारनगर, पुणे 9 – फोन : 9225527649
- 36 अ, 1535, शिवमंगल अपार्टमेंट, टिळक रोड, पुणे 30 - फोन : 020-24432266
- 4 संकेत, भवानी शंकर रोड, गजानन महाराज चौक, दादर पश्चिम. फोन : (022) 24216654
- वेळ : सकाळी 9:30 ते 1:30 व संध्याकाळी 4.00 ते 8.00 (रविवार बंद)

मुंबईचे मावळते पोलीस आयुक्त अहमद जावेद यांना पोलीस दलाने शनिवारी समारंभपूर्वक निरोप दिला. छायाचित्र - गणेश शिर्सेकर

दत्ता पडसलगीकर आज पदभार स्वीकारणार

दत्तात्रय पडसलगीकर

मुंबई: केंद्रात गुप्तचर विभागात तब्बल १७ वर्षे उल्लेखनीय सेवा बजावणारे प्रामाणिक व सुसंस्कृत म्हणून ओळखले जाणारे भारतीय पोलीस सेवेतील वरिष्ठ अधिकारी दत्तात्रय पडसलगीकर यांची मुंबईचे नवे पोलीस आयुक्त म्हणून नियुक्ती झाली आहे. ते आज दुपारी १२ वाजता विद्यमान पोलीस आयुक्त अहमद जावेद यांच्याकडून पोलीस आयुक्तपदाची सूत्रे स्वीकारतील.

अहमद जावेद हे आज सेवानिवृत्त होत असून त्यांची नियुक्ती सौदी अरेबियाचे राजदूत म्हणून करण्यात आली आहे. १९८२च्या तुकडीतील भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी असलेले पडसलगीकर यांनी मुंबईत परिमंडळ दोन तसेच तेव्हाचे वांद्रे येथील परिमंडळ, गुन्हे अन्वेषण विभाग, आर्थिक गुन्हे विभाग तसेच गुप्तचर विभागाचे पश्चिम विभागाचे सहसंचालक म्हणून मुंबईत चार ते पाच वर्षे वास्तव्य अशा पद्धतीने मुंबईच्या जवळ असलेले पडसलगीकर हे धनंजय जाधव यांच्यानंतर मराठी आयुक्त ठरले आहेत.

गुप्तचर विभागात अतिरिक्त संचालक या महत्त्वाच्या पदावर २८ एप्रिल २०१४ पासून ते कार्यरत होते.

'तें'चे 'मी कुमार' पुस्तक रूपात

प्रतिनिधी, मुंबई



प्रकाशन विश्व

मानवी जीवनाचा, त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांचा आपल्या साहित्यकृतीतून वेध घेणारे सृजनशील नाटककार व साहित्यिक विजय तेंडुलकर यांच्या 'वासनाचक्र', 'तुघलक', 'मुखवटे' आणि 'मी कुमार' या अनुवादीत नाटकांपैकी १९८० साली अनुवादीत केलेले 'मी कुमार' या नाटकाचे त्याकाळी पाच प्रयोग झाले, मात्र त्यानंतर आजतागायत कित्येकांना तेंडुलकरांच्या 'मी कुमार' या अनुवादीत नाटकाबद्दल पुरेशी माहिती नसल्याने हे नाटक विस्मरणात गेले होते. परंतु आता या नाटकाची संहिता पुस्तकाच्या रुपाने वाचकांच्या भेटीला येत आहे. नाट्यदिग्दर्शक विजय केंकरे यांनी ही नाट्यसंहिता प्रकाशित करण्यासाठीचे प्रयत्न केल्यामुळे 'पॉप्युलर प्रकाशन'तर्फे या पुस्तकाचे प्रकाशन १४ फेब्रुवारी रोजी 'काळा घोडा महोत्सवा'त करण्यात येणार असल्याचे पॉप्युलर प्रकाशनाच्या अस्मिता मोहिते यांनी सांगितले.

गुजराती लेखक नाटककार मधु राय यांचे 'कुमारनी आगाशी' हे गुजरातीतील एक महत्त्वाचे नाटक असून याचा हिंदी अनुवाद इस्मत चुगताईंनी 'नीला कमरा' नावाने केला होता. तर १९८० साली 'मी कुमार' या नावाने तेंडुलकरांनी या नाटकाचा अनुवाद केला असून 'इंडियन नॅशनल थिएटर'ने याचे पाच प्रयोगही सादर केले होते. सदाशिव अमरापूरकर यांनी या नाटकाचे दिग्दर्शन केले होते. गुजराती व हिंदीमध्ये प्रेक्षकांनी उचलून धरलेल्या या नाटकामध्ये उच्च मध्यमवर्गीय कुटुंब व जवळच्या नातेसंबंधाविषयी भाष्य केले आहे. त्यांचे आपापसातील तणाव-वाद, रहस्यमय रचनेचा आधार घेत मांडले आहे. त्यामुळे नाटकात पुढे काय घडणार? याची उत्सुकता लागून राहते. प्रत्येकाचे एक कल्पनेतील विश्व असते व आपण ते अंतराअंतराने जगावे असे प्रत्येकाला वाटत असते, या मुद्द्याभोवती नाटकातील पात्र उलगडत जातात. या नाटकामधील रहस्यमयता प्रेक्षकांना खिळवून ठेवते. या नाटकात कुमार या पात्राच्या मृत्युचा शोध घेतला जात आहे, मात्र हा शोध केवळ कुमारच्या मृत्यूपुरता सीमित नसून हा शोध सुखवस्तु कुटुंबातील नातेसंबंधाचा, स्त्री-पुरुष संबंधाचा आहे. नाटक अनुवादीत असले तरी नाटकातील अनेक प्रसंगांमध्ये तरुण मुलांची स्त्रीकडे बघण्याची मानसिकता तेंडुलकरांनी कसलाही आडपडदा न ठेवता, धीटपणे दाखवली आहे. या नाटकामध्ये छोट्या संवादाबरोबरच स्वगतांचाही वापर केला आहे. तेंडुलकरांच्या चाहत्यांना व नाट्यकर्मींना चांगली संहिता पुस्तकरुपाने वाचता येणार आहे.

> **१९८० साली 'मी कुमार' हे नाटक सदाशिव अमरापूरकरांनी दिग्दर्शित केले असल्याचे माझ्या स्मरणात होते. 'कुमारनी आगाशी' हे गुजराती व हिंदीमध्ये गाजलेले व तेंडुलकरांनी अनुवादीत केलेले नाटक पुन्हा रंगमंचावर येण्याच्या उद्देशाने 'मी कुमार'चा शोध सुरु केला.३० ते ३५ वर्षांनी प्रकाशित होणाऱ्या 'मी कुमार'च्या नाट्यसंहितेबरोबरच नाटकाच्या प्रयोगाचाही प्रेक्षकांना आस्वाद घेता यावा अशी इच्छा आहे.**
>
> विजय केंकरे, नाट्यदिग्दर्शक

...नामवंतांचा सहभाग

(पान १ वरून)

पुणे महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणाचे आयुक्त महेश झगडे, मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त संजय सेठी, ठाणे महानगरपालिका आयुक्त संजीव जैस्वाल हे शासकीय प्रतिनिधी पायाभूत सोयीसुविधा पुरविताना येणाऱ्या अडचणी तसेच शासनाचे धोरण यावर मते मांडणार आहेत.

'टाटा इन्फ्रास्टक्चर'चे संजय उबाळे, बिर्ला उद्योग समूहाचे अजित रानडे, 'आयआरबी'चे वीरेंद्र म्हैसकर हे पायाभूत सुविधा पुरविणाऱ्या कंपन्यांचे उच्चपदस्थ प्रत्यक्ष येणाऱ्या अडचणी तसेच निधीचे आव्हान या विषयांवर त्यांचे अनुभव सांगणार आहेत. वास्तुविशारद अनंत गाडगीळ आणि नीरा आडारकर, मुंबई विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे संचालक नीरज हातेकर, नगररचना क्षेत्रातील तज्ज्ञ सुलक्षणा महाजन, विकास आराखडा क्षेत्रातील तज्ज्ञ पंकज जोशी, आयआयटी मुंबईतील प्रा. के. मुन्शी, 'एम. इंडिकेटर'चे सचिन टेके, 'के.पी.आय.टी.'चे अनुप साबळे हे पायाभूत सोयीसुविधा क्षेत्रासमोरील आव्हाने, त्यावरील उपाय यावर विचार मांडणार आहेत.

नक्की अडचणी कोणत्या, त्यावरील उपाय, केंद्र व राज्य शासनाची यामागची भूमिका याचा परामर्श या चर्चेच्या माध्यमातून घेतला जाणार आहे.

गुंतवणुकीचे गणित सोडविणारा 'लोकसत्ता अर्थसल्ला' उपक्रम

मंगळवारी दादरमधील कार्यक्रमापासून उपक्रमाची सुरुवात

व्यापार प्रतिनिधी, मुंबई

मिळकतीत जेमतेम वाढ, अमर्याद गतीने वाढत असलेले खर्च यांची तोंडमिळवणी करीत, भविष्यासाठी योजलेल्या उद्दिष्टांसाठी काही पैसा जमवायचा तर गुंतवणुकीचा आधार घेण्याशिवाय पर्यायच नाही. गुंतवणुकीचे उपलब्ध असलेले वेगवेगळे प्रकार, त्यांची परतावा कामगिरी, जोखीम आणि सुरक्षिततेचे घटक हे सर्व पडताळून गुंतवणुकीचे सुयोग्य गणित जुळवून देणारा 'लोकसत्ता अर्थसल्ला' उपक्रम येत्या मंगळवार, २ फेब्रुवारीपासून सुरू होत आहे..

'दिशा डायरेक्ट' प्रस्तुत 'लोकसत्ता अर्थसल्ला'चा पहिला कार्यक्रम मंगळवारी, स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक सभागृह, शिवाजी पार्क, दादर येथे होईल. न्यू इंडिया अश्युरन्स कं. लि. या उपक्रमाची सह-प्रायोजक आहे. बँका-कंपन्यांच्या मुदत ठेवी, सरकारी रोखे व तत्सम स्थिर उत्पन्न देणारे गुंतवणूक पर्याय ते थोडी अधिक जोखीम घेत म्युच्युअल फंडातील गुंतवणुकीच्या पर्यायांबाबत अनुभवी आर्थिक सल्लागार वसंत माधव कुळकर्णी या कार्यक्रमांत मार्गदर्शन करतील.

तर भांडवली बाजारातील गुंतवणुकीचा सुमारे २० वर्षांचा अनुभव गाठीशी असलेले आशीष ठाकूर हे 'शेअर बाजारातील गुंतवणुकीचे तंत्र व मंत्र' उलगडून सांगतील. निवृत्तीपश्चात जीवनासाठी तजवीज म्हणून काय काळजी घ्यावी आणि या संबंधाने गुंतवणुकीच्या पर्यायांचे विवेचन व्यावसायिक गुंतवणूक सल्लागार मिलिंद अंधृटकर हे करतील.

सोप्या भाषेतील, सुबोध उदाहरणे आणि दृकश्राव्य सादरीकरणासह होत असलेल्या तज्ज्ञांचे मार्गदर्शन गुंतवणूकदारांसाठी निश्चितच उद्बोधक ठरावे. उपस्थितांना आपले नेमके प्रश्न या कार्यक्रमांतून थेट तज्ज्ञांना विचारून त्याचे निरसनही करून घेता येईल. **सभागृहाच्या आसनक्षमतेनुरूप प्रवेश मर्यादित आणि प्रथम येणाऱ्यास, प्रथम प्राधान्य या तत्त्वानुसार दिला जाईल.**

कधी?
मंगळवार, २ फेब्रुवारी,
सायंकाळी ५ वाजता

कुठे?
स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय
स्मारक सभागृह, शिवाजी पार्क,
दादर

रस्त्यावरील अतिक्रमणे तातडीने हटविण्याचे आयुक्तांचे आदेश

ठाणे : गेले काही दिवस शहरात सुरू असलेली रस्ता रुंदीकरण मोहीम अधिक तीव्र करण्याचे आदेश शनिवारी महापालिका आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

सकाळी महापालिका आयुक्तांनी भायंदर पाडा येथील खेळाच्या मैदानाजवळील विकास आराखड्यातील रस्ता ४० मीटर व ३० मीटर रुंद करणे, वेदांत रुग्णालय ते विहंग व्हॅली हा रस्ता ४० तर त्यालगतचा रस्ता ३० मीटर रुंद करणे, भक्ती पार्कमागील ग्रॅन्ड स्वेअर संकुल ते पार्क वूड संकुल रस्त्याचे ३० मीटर रुंदीकरणाची कार्यवाही तात्काळ करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्याचप्रमाणे सुभाष पथ, छत्रपती शिवाजी पथ, स्थानक परिसर रस्ता, मो. ह. विद्यालय आदी ठिकाणी भेट देऊन तेथील रस्त्यात आलेली सर्व वाढीव बांधकामे तोडण्याचे आदेशही त्यांनी दिले. तसेच या ठिकाणी रस्ता रुंदीकरणाचे प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना शहर विकास विभागाला दिल्या.

PIDILITE INDUSTRIES LIMITED

EXTRACT OF STANDALONE UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER & NINE MONTHS ENDED 31.12.2015

Particulars	(₹ in lakhs) Quarter ended 31.12.2015	Nine Months ended 31.12.2015	Quarter ended 31.12.2014
Total income from operations (net)	117669	364759	108158
Net Profit / (Loss) from ordinary activities after tax	18570	58800	12372
Net Profit / (Loss) for the period after tax (after Extraordinary items)	18570	58800	12372
Equity Share Capital	5127	5127	5127
Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of previous year) *	-	-	-
Earnings Per Share (before extraordinary items) (of ₹ 1 /- each)			
Basic:	@ 3.62	@ 11.47	@ 2.41
Diluted:	@ 3.62	@ 11.46	@ 2.41
Earnings Per Share (after extraordinary items) (of ₹ 1 /- each)			
Basic:	@ 3.62	@ 11.47	@ 2.41
Diluted:	@ 3.62	@ 11.46	@ 2.41

* Reserves (excluding revaluation reserve) as per Balance Sheet of previous accounting year i.e. 31.03.2015 was ₹ 229818 lakhs.

EXTRACT OF CONSOLIDATED UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER & NINE MONTHS ENDED 31.12.2015

Particulars	(₹ in lakhs) Quarter ended 31.12.2015	Nine Months ended 31.12.2015	Quarter ended 31.12.2014
Total income from operations (net)	133908	412860	120219
Net Profit / (Loss) from ordinary activities after tax	18591	60485	12414
Net Profit / (Loss) for the period after tax (after Extraordinary items)	18591	60485	12414
Equity Share Capital	5127	5127	5127
Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of previous year) **	-	-	-
Earnings Per Share (before extraordinary items) (of ₹ 1 /- each)			
Basic:	@ 3.62	@ 11.76	@ 2.43
Diluted:	@ 3.62	@ 11.75	@ 2.42
Earnings Per Share (after extraordinary items) (of ₹ 1 /- each)			
Basic:	@ 3.62	@ 11.76	@ 2.43
Diluted:	@ 3.62	@ 11.75	@ 2.42

** Reserves (excluding revaluation reserve) as per Balance Sheet of previous accounting year ie.31.03.2015 was ₹ 221931 lakhs.

@ For the period only and not annualised.

Note: The above is an extract of the detailed format of Quarterly Unaudited Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Unaudited Financial Results are available on www.nseindia.com and www.bseindia.com and on Company's website www.pidilite.com

Place: Mumbai
Date: 29th January, 2016

M. B . Parekh
Executive Chairman

Regd. Office: 7th Floor, Regent Chambers, Jamnalal Bajaj Marg, 208 Nariman Point, Mumbai - 400 021.
Tel.: + 91 22 2835 7000 | **Fax.:** + 91 22 2835 6007 | **Email:** investor.relations@pidilite.co.in | **Website:** www.pidilite.com
CIN: L24100MH1969PLC014336